# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११००४.

**विषय : सन २०२१-२२ च्या इयत्ता ११ वी प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या सामाईक प्रवेश परीक्षेसंदर्भात (CET) हेल्पलाईन सुविधा उपलब्धतेबाबत**

# प्र क ट न

---

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेचा निकाल दि.२८ मे,२०२१ रोजीच्या शासन निर्णयातील मूल्यमापन कार्यपध्दतीनुसार दि.१६/०७/२०२१ रोजी जाहीर करण्यात आलेला आहे.

शासन निर्णय दि.२८ मे, २०२१ व दि.२४ जून, २०२१ नुसार इ.११ वी प्रवेशासंदर्भात संपूर्ण राज्यामध्ये एक सामाईक प्रवेश परीक्षा (CET) आयोजित करण्याचा निर्णय होऊन त्याचा तपशील निश्चित केलेला असून सदर परीक्षेचे आयोजन मंडळामार्फत करण्याबाबत शासनाने निर्देश दिलेले आहेत.

त्याअनुषंगाने सन २०२१-२२ च्या इयत्ता ११ वी प्रवेशासंदर्भात सामाईक प्रवेश परीक्षेचे आयोजन मंडळामार्फत शनिवार दि.२१ ऑगस्ट, २०२१ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी १.०० या कालावधीत करण्यात येणार आहे. सदर परीक्षा ही राज्य मंडळाशी संलग्न असलेल्या कनिष्ठ महाविद्यालयातील सन २०२१-२२ मधील इ.११ वी प्रवेशासाठी असून ती विद्यार्थ्यांसाठी पूर्णतः ऐच्छिक स्वरुपाची आहे. सदर परीक्षा ही ऑफलाईन स्वरुपाची असून ती राज्य मंडळाच्या अभ्यासक्रमावर आधारीत असेल. प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची (Multiple Choice Objective type Questions) व O.M.R. आधारीत असेल. या परीक्षेसाठी राज्य मंडळ अथवा अन्य मंडळाच्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेमध्ये उत्तीर्ण/प्रविष्ट झालेल्या इच्छूक विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने मंडळाच्या http://cet.mh-ssc.ac.in या संकेतस्थळावरुन आवेदनपत्र सादर करणे आवश्यक आहे. आवेदनपत्र भरण्याची सुविधा मंडळामार्फत दि.२०/०७/२०२१ रोजी सकाळी ११.३० पासून दि.२६/०७/२०२१ अखेर उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सदर आवेदनपत्र भरण्यासंदर्भात तसेच सामाईक प्रवेश परीक्षेसंदर्भात विद्यार्थ्यांसाठी तपशीलवार सूचना सदर प्रकटनासोबत तसेच मंडळाच्या संकेतस्थळावरही उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

**सदर इयत्ता ११ वी प्रवेशासंदर्भात सामाईक प्रवेश परीक्षेबाबत** येणाऱ्या अडचणींसंदर्भात संबंधित घटकांना मार्गदर्शन करण्यासाठी विभागीय मंडळनिहाय स्वतंत्र हेल्पलाईन सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहे. विभागीय मंडळ निहाय संबंधित कार्यालयाचे सहसचिव/सहा.सचिव/अन्य अधिकारी सबंधितांना हेल्पलाईनव्दारे मार्गदर्शन करणार आहेत. त्यासाठी त्यांचे भ्रमणध्वनी क्रमांक खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र | विभागीय मंडळाचे नाव | विभागीय सहसचिव/सहा.सचिव यांचे नाव | भ्रमणध्वनी क्रमांक | ई-मेल आयडी |
|---|---|---|---|---|
| १ | पुणे | श्रीम.प्रिया शिंदे, सहसचिव<br>श्रीम.संगिता शिंदे, सहा.सचिव | 9689192899<br>8888339530 | sscboardpune@gmail.com |
| २ | नागपूर | श्रीम.माधुरी सावरकर, सचिव (प्र.) तथा सहसचिव<br>श्री.व्ही.एच.जोग, सहा.सचिव | 9403614142<br>9890514839 | msboardnagpur@gmail.com |
| | | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | मुंबई | श्री राजेंद्र अहिरे, विभागीय सचिव (प्र.)<br>श्रीमती निलम ढोके प्र. सहा सचिव तथा व. अधिक्षक<br>श्रीमती एस.एस.फाटक वरिष्ठ अधीक्षक | 9423933435<br>9869086061<br><br>9869433816 | sschsc.mumbaiboard@gmail.com |
| ४ | औरंगाबाद | श्री.राजेंद्र पाटील, सहसचिव<br>श्री.आर.आर. गगे,व.अधिक्षक | 9922900825<br>9423469712 | chair.aurboard@mahedu.gov.in |
| ५ | अमरावती | श्रीम.जयश्री राऊत, सहा.सचिव<br>श्री एस.यु.तलवारे, शिफ्ट इनचार्ज | 9960909347<br>9423621647 | divsecamt@rediffmail.com |
| ६ | कोल्हापूर | श्री.देविदास कुलाळ, सचिव (प्र.) तथा सहसचिव<br>श्रीम.सुवर्णा सावंत, सहा.सचिव | 7588636301<br><br>8007597071 | divsec.kop@gmail.com |
| ७ | नाशिक | श्रीम. एम.यु.देवकर, सहा.सचिव (प्र.)<br>श्री डी.के.आंधळे, वरिष्ठ अधीक्षक | 8888339423<br>8329004899 | nsksec@rediffmail.com |
| ८ | लातूर | श्री.संजय पंचगल्ले, सहा.सचिव<br>श्री.ए.पी.चवरे, वरिष्ठ अधिक्षक | 9421694282<br>9421765683 | divsecretarylatur@gmail.com |
| ९ | कोकण | श्रीम.भावना राजनोर, सहसचिव<br>श्री.दिपक पोवार, वरिष्ठ अधिक्षक | 8806512288<br>8830384044 | divchairman.konkan@gmail.com |

(डॉ.अशोक भोसले)
सचिव,
राज्य मंडळ,पुणे.

दि.२०/०७/२०२१